**<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १०/२०१७ मधील नि. ९२,९४ व ९६ खालील संयुक्त आदेश</u>**

सुभाष यशवंत शितोळे अर्जदार

*<u>विरुद्ध</u>*

राजेंद्र महादेव शितोळे सामनेवाला

१. अर्जदार तर्फे अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. प्रस्तुत प्रकरणातील सामनेवाला क्र. ४९ सुनंदा सोमा भुजबळ या ता.०३.११.२०१० रोजी व सामनेवाला क्र. ५० वैशाली दामोदर सावंत या ता. २०.०६.२००८ रोजी मयत झाल्या आहेत. सदर अर्जातील मूळ दावा सामनेवाला क्र. १ यांनी अर्जदार वगैरे यांचे विरुध्द वाटपासाठी दाखल केला होता. त्यामुळे मयत सामनेवाला यांचे वारस याकामी आवश्यक पक्षकार आहेत. तरी सामनेवाला क्र. ४९ यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी ६ वर्षे ९ महिने १६ दिवस व सामनेवाला क्र. ५० यांचे वारस रेकॉर्डवर घेणेसाठी ९ वर्षे १ महिना २९ दिवस इतका उशीर झाला आहे. तरी त्यांचे वारस रेकॉर्डवर आणणेसाठी झालेला विलंब माफ करुन, अबेटमेंटचा आदेश सेट असाईड करुन वारस रेकॉर्डवर आणणेस व तशी दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेसाठी प्रस्तुतचे अर्ज दाखल केलेले आहेत.

२. सदर वारस रेकॉर्डवर आणणेकरीता ता. १३.११.२०१७ पर्यंत मुदत होती. सामनेवाला क्र.४९ व ५० यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला उशीर हा अर्जदार यांच्या निष्काळजीपणामुळे झालेला नसून सामनेवाला क्र. ५० या सन २००८ मध्ये मयत आहेत व सामनेवाला क्र. ४९ या मयत आहेत असा बेलिफ रिपोर्ट आला आहे. त्यामुळे तशी दुरुस्ती या अर्जातील मूळ दाव्यामध्ये सामनेवाला क्र. १ वादी यांनी करणे आवश्यक होते परंतु त्यांनी तशी दुरुस्ती केलेली नसल्याने ती अर्जात करणे बेलिफ रिपोर्टमुळे

अर्जदार यांना भाग आहे. सदर उशिर माफ न झाल्यास अर्जदार यांचे कधीही पैशाने भरुन येणार नाही असे अपरिमित नुकसान होणार आहे व त्यांना त्यांचे नैसर्गिक न्यायहक्कास मुकावे लागणार आहे.

३. सदर वारस आवश्यक पक्षकार असल्याने ते रेकॉर्डवर घेणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक आहे. तरी सामनेवालाचे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला विलंब माफ करुन मिळणेस, अबेटमेंट सेट असाईड करुन मिळणेस व वारस रेकॉर्डवर आणणेस व तशी दुरुस्ती करणेस परवानगी मिळणेस विनंती आहे.

४. सदर अर्जाकामी सामनेवाला यांनी म्हणणे दाखल केलेले नाही.

५. अर्जांचे अवलोकन केले. नि. ९२, ९४, व ९६ नुसार सामनेवाला क्र. ४९, व ५० च्या वारसांना नोटीसा पाठविणेत आल्या होत्या. परंतु ते हजर राहीलेले नाहीत. सामनेवाला क्र.४९ व ५० यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस झालेला उशीर हा अर्जदार यांच्या निष्काळजीपणामुळे झालेला नसून सामनेवाला क्र. ५० या सन २००८ मध्ये मयत आहेत व सामनेवाला क्र. ४९ या मयत आहेत असा बेलिफ रिपोर्ट आला आहे. त्यामुळे तशी दुरुस्ती या अर्जातील मूळ दाव्यामध्ये सामनेवाला क्र. १ वादी यांनी करणे आवश्यक होते परंतु त्यांनी तशी दुरुस्ती केलेली नसल्याने ती अर्जात करणे बेलिफ रिपोर्टमुळे अर्जदार यांना भाग आहे. या अर्जदारच्या कथनात तथ्य असल्याचे दिसून येते.

६. वादविषयाचे अंतिमतः निराकरण होणेकरीता अर्ज गुणदोषावर चालणे आवश्यक आहे. वाद विषयाचे अंतिम निराकरणाकरीता अर्जात आवश्यक पक्षकारांना सामील करुन घेणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळे नि. ९२,९४ व नि.९६ वरील अर्ज मंजुर करुन अर्जात नमूद आवश्यक पक्षकारांना अर्जाचे कामी सामील करणेस व तशी अर्जात दुरुस्ती करणेस परवानगी देणे न्यायोचित आहे. सबब, खालील आदेश करण्यात येत आहे.

## **आ दे श**

१.    नि.९२,९४ व ९६ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहेत.

२.    अर्जदारतर्फे, अर्जदार यांचे अर्जात नमूद आवश्यक पक्षकार, अर्जाचे कामी विहित मुदतीत समाविष्ट करावेत व तशी दुरुस्ती करावी.

सही/-xxxxx

दिनांकः-०४/१०/२०२२    (एम्.क्यु.एस्.एम्.शेख)

प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी.